# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/४६२ /२०२४-२५ दिनांक :२२/०८/२०२४

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(धोकादायक झाड/ विकासकामात बाधित झाड मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे/ विकासकामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/४८०२ /२०२४-२५** **दिनांक :२२ ०८ /२०२४**

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) भारती पार्क युनिटी कॉम्पलेक्स जवळ मनपा रोडवरील धोकादायक झाड काढणे. ठेका उद्यान अधिक्षक यांची दि.०६/०८/२०२४ रोजीची प्रत्यक्ष पाहणी** | | | | | |
| १ | रेन्ट्री | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड भारती पार्क युनिटी कॉम्पलेक्स जवळ मनपा रोडवरील असून गटाराच्या बाजूला आहे.गटाराचे तसचे बाजूस असलेल्या भिंतीस तडे गेले आहे. झाड पुर्ण एका बाजूस झुकलेले असून जोराच्या वाऱ्याने व पावसाने पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |
| **२) डी.के. एटंरप्रायजेस यांचे दि.२०/०८/२०२४ रोजीचे पत्र** | | | | | |
| १ | गुलमोहर | १० ते १२ फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-नवघर सर्वे क्र./हिस्सा क्र. नविन १७२/४,६ जुना ४०५/४,६ येथील इमारतीच्या गेटच्या मधोमध, मनपा रोड वरील असल्याने वाहाने जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(कांचन गायकवाड)**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**